अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
मध्यवर्ती इमारत, २ रा मजला, पुणे-०१
दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२४८१५
फॅक्स क्रमांक- ०२०/२६१२५८७८
Email- igoffice.industry-mh@gov.in

---

**परिपत्रक**

जा.क्र.कारागृह उद्योग/वस्तु व सेवाकर/ 9201 /२०१८/कक्ष-१० दिनांक 1/10.०९.२०१८

**विषयः-** दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१८ पासून करपात्र वस्तू/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाच्या प्रदानातून २ टक्के (TDS) टीडीएस वजावट करणेबाबत.

**संदर्भः-** १. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक ७९४२ दिनांक १२.०९.२०१८
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०१८/प्र.क्र.१४४/२०१८/कोषा प्रशा-५, दिनांक २८ सप्टेंबर, २०१८

उपरोक्त विषयान्वये वस्तु व सेवाकर अंतर्गत कार्यालयाची नोंदणी करुन योग्य ती कार्यवाही करणेबाबत संदर्भांकित परिपत्रकान्वये सुचित करण्यात आले होते.

तथापि, महाराष्ट्र वस्तू व सेवाकर अधिनियम २०१७ व केंद्रित वस्तू व सेवाकर अधिनियम २०१७ च्या कलम-५१ मध्ये वस्तु किंवा सेवा अथवा दोन्ही यांच्यावर मुळ स्त्रोतातून वजात करण्याची (TDS) तरतूद करण्यात आली असुन सदर तरतूदींची अंमलबजावणी दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१८ पासून करावयाचे निर्देश संदर्भांकित शासन परिपत्रकान्वये दिले आहेत.

यास्तव शासन परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच याबबत काही शंका अथवा मार्गदर्शनाची आवश्यकता असल्यास परिपत्रकासोबत जोडलेल्या यादीमधील आपल्या संबंधित जिल्ह्यातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधुन वेळेत कार्यवाही करावी. तसेच उक्त प्रकरणी दिरंगाईकरिता शास्तीची तरतूद असल्याने संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

29-9-18

(डॉ. विठ्ठल जाधव)
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक
कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**प्रति,**

प्रादेशिक विभाग प्रमुख (सर्व)
अधीक्षक, कारागृह (सर्व)
प्राचार्य, दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे
प्रायार्य, किशोर सुधारालय, नाशिक
संपर्क अधिकारी, खुली वसाहत, आटपाडी
आहरण व संवितरण अधिकारी, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत - ecell - कक्ष-13